# कै.ना.प.अभ्यंकर निरीक्षण गृह,रत्नागिरी.

जिल्हा उदयोग केंद्रा शेजारी , बोर्डिंग रोड ,रत्नागिरी -४१५६१२ दूरभाष क्र.-०२३५२-२२२९३७

जा.नं./निगृर/दूध/अर्थसहाय्य/२०१५-१६ / 294 दिनांक - ०६/१०/२०१५

प्रति,

मा.श्री. नंदकुमार पटवर्धन,
आसमंत बेनेवोलन्स फाउंडेशन ,
एम.आय.डी.सी.रत्नागिरी.

विषय - संस्थेतील मुलांना दुध देण्यासाठी अर्थ सहाय्य करुन केलेल्या बहुमुल्य सहकार्या बाबत.

संदर्भ - आपण आपल्या संस्थेस प्रत्यक्ष भेट देऊन संस्था पदाधिका-यांशी केलेली चर्चा.

महोदय,

वरिल संदर्भित विषयानुसार आपण आपल्या संस्थेस प्रत्यक्ष भेट देऊन संस्थेविषयी व संस्थेच्या कामकाजा विषयी आपुलकीने व आस्थेने माहिती करुन घेतलीत.संस्थेच्या पदाधिका-यांशी संस्थेच्या विविध अडचणी व सोयीसुविधां बाबत चर्चा करीत असताना आपल्या संस्थेतील मुलांना नियमित दुध देण्यासाठी दरमहा रुपये ६०००/- या प्रमाणे अर्थ सहाय्य करण्याचे अभिवचन देऊन माहे जुलै व ऑगस्ट २०१५ चे रुपये १२०००/- प्रत्यक्ष जमा करुन त्याची अंमलबजावणी ही केलीत व असेच निरंतर अर्थसहाय्य करण्याची हमी व आश्वासनही दिलेत .

आपल्या सारख्या सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून समाजकार्य करीत असलेल्या संस्थांच्या व दानशूर व्यक्तिंच्या दातृत्वामुळे आम्हाला नव्या उमेदीने व उत्साहाने समाजकार्य करण्याची प्रेरणा मिळते. आपण आपल्या संस्थेच्या माध्यमातून विविध ठिकाणी विविध प्रकारचे राबवीत असलेले समाजोपयोगी व समाज प्रबोधनाचे उपक्रम अशाच प्रकारे निरंतर व मोठया प्रमाणात राबविण्यासाठी आपणास व आपल्या संस्थेच्या अन्य पदाधिका-यांना व कार्यकर्त्यांना आमच्या संस्थेतर्फे मन:पुर्वक हार्दिक शुभेच्छा!

आपल्या पुढिल कार्यास व वाटचालीस हार्दिक सदिच्छा!

आपला विश्वासू,

( डॉ.संतोष वामन बेडेकर)
मानद सचिव
निरीक्षण गृह-बालगृह,रत्नागिरी